# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषयः**महाविद्यालय/संस्थांची बँक खाते विषयक माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत.

**संदर्भ : परिपत्रक क्र. वित्त/२०१७-१८/१७०८, दि. ३०.१२.२०१७**

महाविद्यालयांची/संस्थांची बँक खाते विषयक माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत वरील संदर्भांकित परिपत्रक काढण्यात आले होते. यास महाविद्यालयांनी/संस्थांनी अत्यल्प प्रतिसाद दिलेला दिसत आहे. आतापर्यंत १५% महाविद्यालयांनी/संस्थांनी बँक खातेची माहिती अद्ययावत केलेली आहे. उर्वरित महाविद्यालयांनी/ संस्थांनी बँक खातेची माहिती अद्याप अद्ययावत करण्यात आलेली नसल्यामुळे विद्यापीठास महाविद्यालयाच्या/संस्थांच्या खात्यामध्ये रक्कम वर्ग करण्यासाठी RTGS/NEFT चा वापर करणे अडचणीचे होत आहे. ज्या महाविद्यालयांनी/संस्थांनी आपल्या बँक खात्याची माहिती अद्ययावत केलेली नाही, अशा सर्व महाविद्यालयांना/संस्थांना पुन्हा एकदा निर्देशित करण्यात येते की, आपली बँक खाते विषयक माहिती त्वरित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावी. लिंक खालील प्रमाणे आहे.

http://bcud.unipune.ac.in/CollegeDetails/ExistingCollege/College_BankInfo.aspx

**OR**

BCUD College Login -->After college Login Go to Main Menu --> Click College Details -->Click Finance Bank Details.

(सीए (डॉ.) विद्या गारगोटे)
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/२४८
दिनांक : १८ मे, २०१८

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय**: विद्यापीठाच्या पत्रव्यवहारामध्ये PUN CODE चा उल्लेख करणेबाबत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/ संस्था यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने PUN CODE दिलेला आहे. सध्या वित्त व लेखा विभागाच्या लेख्यांमध्ये महाविद्यालयाचा/ संस्थाचा PUN CODE अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ब-याच वेळेस महाविद्यालयाच्या/ संस्थांच्या नावामध्ये साधर्म्य असल्यामुळे लेख्यांतील नोंदी अचूक होण्यास अडचणी निर्माण होतात. सबब आपलेकडून होणा-या पत्रव्यवहारावर PUN CODE चा स्पष्ट उल्लेख झाल्यास व्यवहाराच्या नोंदी अचूक व जलद होतील.

आपणास विनंती की, यापुढे वित्त व लेखा विभागाशी पत्रव्यवहार करीत असताना आपल्या महाविद्यालयाचा/ संस्थेचा PUN CODE चा आवर्जून उल्लेख करण्यात यावा.

(सीए (डॉ.) विद्या गारगोटे) 23/5/18
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/२७५
दिनांक : २३ मे, २०१८

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था

2018/Circular